बँकिंग, बिझनेस इन्व्हेस्टमेंट
अमृतवेल PLUS
amrutwelplus.com
July-Sept 2010
Rs. 30/-

कोकण Expo

# येवा कोकण आपलाच असा...



आजचं जीवन धकाधकीचं झाले आहे... ताणतणाव, स्पर्धा, यश, अपयश या संघर्षात प्रत्येकाला विसावा हवा असतो. त्यामुळेच कुठेतरी वीकएंड साजरा करण्याची कल्पना आता रूढ होऊ पाहतेय. कोकण यासाठी अप्रतिम.

नितांतसुंदर सागरकिनारे, मऊशार शुभ्र रेती, नारळी-पोफळीच्या बागा, कौलारू घरं, सर्वत्र पसरलेली हिरवाई आणि या हिरवाईची शाल लेऊन उभे असलेले डोंगरकडे...

कोकणचं हे सौंदर्य प्रत्येक हळव्या मनाला साद घालतं. हीच गरज ओळखून, त्याला व्यावसायिकतेची जोड देत, कोकणच्या मातीत, आंबा, फणस माडांच्या बनात 'चॉईस' या आंतरराष्ट्रीय शृंखलेने आलिशान या शब्दाला साजेसं 'क्वालिटी रिसॉर्ट' उभे केले आहे. 'येवा कोकण आपलाच असा' अशी साद घालत या रिसॉर्टने वेगळा ठसा उमटवत चिपळूणची नवी ओळख निर्माण केली आहे.

– संकलन : संदावि, पुणे



क्वालिटी रिसॉर्टमध्ये ३७ ऐसपैस वातानुकूलित खोल्या आहेत. प्रत्येक खोलीचा एरिया साधारण ४७५ चौरस फूट आहे. प्रत्येक खोलीला स्वतंत्र बाल्कनी आहे. प्रत्येक खोलीमध्ये स्वतंत्र मिनी बार आहे. टीव्ही सेट, हेअर ड्रायर, टी अँड कॉफी मेकर, बाथरोब्जची सुविधा आहे. तसेच, प्रत्येक खोलीमध्ये दोन क्वीन साईज बेड आहेत. चौघांच्या कुटुंबासाठी आरामदायी किंवा कॉन्फरन्सदरम्यान या खोल्या शेअरही करता येऊ शकतात.





गुहागर, वाल्नेश्वर, गणपतीपुळे यासारखे बीच, गोवलकोटसारखा किल्ला, परशुराम, व्यादेश्वर, वाल्नेश्वर हेदवी यांसारखी मंदिरे या परिसरात आहेत. वासिष्ठीचा रिव्हर व्ह्यू अगदी मोहक आहे. अवघ्या १० किलोमीटर अंतरावर असणाऱ्या वासिष्ठी नदीत बोटिंगची मजाही लुटता येते. गर्दीपासून दूर, निसर्गाच्या सानिध्यात, टेकड्यांच्या कुशीत असणाऱ्या चिपळूणला भेट देऊन पर्यटनाचा मनमुराद आनंद लुटायलाच हवा.

निसर्गाचे सानिध्य म्हणजे काय, याचा नेमका आणि प्रसन्न अनुभव हे रिसॉर्ट देते. रिसॉर्टचा रिव्हर व्ह्यू शहरवासीयांची तबीयत खूश करून टाकतो. परिसरातील सुंदर-मोकळी बाग मनाला खूश करतात. समोर संथ वाहणारी वासिष्ठी नदीही खुणावते. वेगवेगळे दुर्मीळ वृक्ष रिसॉर्टच्या परिसरात आहेत. शिवाय, २०० ते २५० प्रकारचे पक्षी इथे आढळतात. निसर्गाच्या कुशीत निवांतपणा अनुभवायला येणाऱ्यांसाठी क्वालिटी हे एक आकर्षण ठरत आहे.